## - प्रकरण ४ -

### हुकूमतपन्हा म्हणूनचे पंताचे प्रशासन आणि राजारामाला सहाय्य:

इ.स. १६८९ मध्ये संभाजी राजांचा वध झाल्यावर मराठा राज्यात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती. औरंगजेबाच्या रुपाने महाबलाढ्य असा, मोगल शत्रू उंबरठयावर बसलेला होता. अशा कठीण समयी छत्रपतीच्या घराण्यातील मराठा राज्याचे वारस सांभाळणे आणि राज्य टिकविणे, ही दोन अत्यंत महत्त्वाची व जोखमीची कार्ये मराठयांच्या राजमंडळाला पार पाडावयाची होती. संभाजीची पत्नी आणि मुलगा या दोघानांही मोगलांनी पकडलेले होते. तेव्हा संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम व त्याच्या तीन राण्या, यांचे संरक्षण करणे फार महत्त्वाचे काम होते. महाराष्ट्रात त्यावेळी मोगल सैन्याने मराठयांच्यावर सर्व बाजूंनी जोरदार आघाडया उघारल्या होत्या. विशेषत:, महाराष्ट्राच्या उत्तर भागात मोगल सैन्याने सर्व प्रदेश मारून काढण्याचा सपाटा सुरु केला होता. त्यामुळे राजारामाला महाराष्ट्रात सुरक्षित ठेवणे अशक्य होते. म्हणून सर्वांच्या विचाराने त्याला कर्नाटकातील मराठा राज्यातील जिंजी येथे पाठविण्याचा निर्णय घेतला. तेव्हा केशव पंडिताने सांगितल्याप्रमाणे जिंजीकडे जाण्याच्या वेळी राजारामाने पूर्वी केवळ विशेषाधिकार[१] असलेल्या रामचंद्रपंतास पुन्हा सचिव पद दिले आणि त्याचा अष्टप्रधान मंडळात समावेश केला. म्हणजे पंताच्या पूर्वीच्या कर्तृत्वाचा व राजनिष्ठेचा विचार करुनच अष्टप्रधान मंडळात समावेश केलेला दिसतो. म्हणून त्यावेळेच्या संदर्भात केशवपंडितानी त्यांचा उल्लेख "श्री सचिव" असा केला आहे.[२] पुढे राजाराम महाराज जिंजीला पोहोचल्यावर तेथून त्याने आपले नवे अष्टप्रधान मंडळ घोषित केले.

---

१. बेंद्रेसंभाजी., पृ.१०१.

२. बेंद्रेराजाचरितम्., पृ. ६०.

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ते सामान्यत: सप्टेंबर १६९० मधील आहे. त्यामध्ये त्याने रामचंद्रपंतास "हुकूमतपन्हा"[3] म्हणून नेमले. पण सरदेसाईचे हे मत चुकीचे दिसते. कारण शंकराजी नारायणाच्या शके १६१२ पौष शु।। २ (२२ डिसेंबर १६९०) च्या एका पत्रात असा स्पष्ट उल्लेख आहे की, "सांप्रत राजश्री स्वामी कृपाळू होऊन आम्हास सुरनिशीचा कार्यभाग सांगितला-- रामचंद्रपंतास मुजमुचा कार्यभाग."[४] याचा अर्थ असा होऊ शकेल, की मुजमुचा म्हणजे 'अमात्य' पदाचा रामचंद्रपंताचा जो अधिकार संभाजीच्या कालात गेलेला होता तो अधिकार त्याना राजाराम महाराजाने परत दिलेला होता. केशव पंडित यांनी सांगितल्याप्रमाणे रामचंद्र-पंतास जो 'सचिव' पदाचा अधिकार जिंजीकडे जाताना दिलेला होता, तो काढून घेऊन शंकराजी नारायण याच्याकडे दिला. शिवाय आपल्या पश्चात स्वराज्याची सर्व जाबाबदारी पाहण्याची सुध्दा म्हणजे "हुकूमतपन्हा" अधिकाराची जबाबदारी सुध्दा पंतावर सोपविलेली होती. अशा त-हेने रामचंद्रपंताच्याकडे सर्वाधिकार दिले असल्याने काहीसरदार नाराज होण्याची शक्यता होती. तेव्हा ती बाब लक्षात घेऊन राजारामाने व राजमंडळातील प्रमुखांनी रामचंद्रपंताने "हुकूमतपन्हा" या नात्याने काम करताना ब्रिज किशोर म्हणतात त्याप्रमाणे ताराबाईच्या सल्ल्याने काम करावे,असे सांगितल्याचे दिसते.[5] आणि मग आपल्या पश्चात त्याने स्वराज्यात कोणकोणती कामे करावी, हे पुढील प्रमाणे सांगितले--

"राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वीचे तेच ऐसें लक्षा ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेत राहून, पूर्वीहून विशेष पराक्रम करून, औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावें. मेविशी सर्वांचीं शपथाप्रमाणे व्हावी. येणे प्रमाणे सर्वांची

---

३. सगोसराजाराम., पृ. ४२.
४. भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष ९, अंक ४, पृ. ६६-६७.
5. Brij, Kishore, op. cit., pp. 32 - 33.

एकवाक्यता करून कर्ती माणसें बरोबर घेऊन राजाराम बाहेर पडला. रामचंद्रपंताने राज्य संरक्षणाचे दु:सह ओझें सांभाळण्याचें कबुल केलें. त्यानें किल्लोकिल्ली फिरते राहून राज्य राखावें, मोगलाशी लढावें रायगडवरील माणसांची सुटका करावी, आणि विशाळगडावरील राजकुटूंबाचा बंदोबस्त ठेवावा.[६]

पंताचे प्रशासनीय कार्य:

रामचंद्रपंतावरस्वराज्याची मदार ठेवून राजाराम महाराज व काही कर्ते लोक जिंजीला गेले. त्यामुळे स्वराज्यातील प्रशासनाची सर्व जबाबदारी रामचंद्रपंताच्यावर पडली होती. त्याना त्या बाबतीत निर्णय घेताना ताराबाईला विश्वासात घ्यावे लागत होते. पण सर्व निर्णयाची जबाबदारी त्यांच्यावरच होती. कारण तेच एक सर्वात मोठे कर्ते पुरुष म्हणून महाराष्ट्रात ठेवलेले होते. त्यानुसार पंताना महाराष्ट्रातील मुलकी आणि लष्करी, अशा दोन्ही प्रकारच्या प्रशासनांची जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी लागत असे. लष्करी प्रशासन आणि मोगलांच्या विरुध्दचा मराठ्यांचा लढा, याविषयीची माहिती गेल्या प्रकरणात आवश्यक तेवढी दिलेली आहे. या प्रकरणात मुलकी प्रशासनाविषयी व मुलकी प्रशासनाला संबंधीत असलेल्या काही लष्करी धोरणांच्या संबंधी पंतानी कसे कार्य केले याची माहिती देण्याचा येथे प्रयत्न आहे.

राजाराम महाराज जिंजीला गेले तेव्हा मराठा प्रशासनासमोर सर्वात मोठी अडचण आर्थिक स्वरुपाची होती. औरंगजेबाच्या विरुध्द लढा चालू असतानाच राज्याचा महसूल जमा करणे, त्याच्यामध्ये वृध्दी करणे व तो सततपणे कसा

---

६. सगोसमरि.,भाग २., पृ. ६९५.

मिळत राहिल, याची व्यवस्था करणे; अत्यंत महत्त्वाचे काम होते. रामचंद्रपंताने अशा परिस्थितीत आपल्या कामाला कसा प्रारंभ केला याची, माहिती देताना बा.प्र. मोडक सांगतात--

"शिवाजी महाराजांची सर्व शिस्त सुरु करून पूर्व मर्यादे प्रमाणे व महाराजांनी धारे करून दिले होते त्याप्रमाणे सर्व राज्य चालवूं लागले. ज्यांनीं ज्या प्रांतांत जाऊन पाळेगीरीनें मुलूख मारून चौथ, सरदेशमुखी, घांसदाणा वगैरे अंमल बसवून राहतों असें म्हटलें, त्यांस किताब व त्या प्रांताच्या सनदा देऊन रवाना केलें. तोच प्रकार रामचंद्रपंतानें इकडेही सुरु केला."[७]

तथापि राजाराम महाराज जिंजीला गेल्यावर तथा रायगड घेतल्यावर औरंगजेबाने मराठ्यांचे स्वराज्य जिंकले असे समजून, मुलकी व्यवस्था नीटपणे लावावयाचे हुकूम सोडले. त्यानुसार, "देशमुख देशपांडे, पाटील, कुलकर्णी इत्यादींना बोलावून त्यांची वतने कायम करणे, त्यांचे आपसातील तंटे तोडणे, शेतसा-याच्या वसुलीची व्यवस्था करणे जिंकलेल्या प्रदेशातून शेकदार, अमीन, किल्लेदार, फौजदार इत्यादी अधिकारी नेमणे ही कामे चालू झाली. वतनदारांची धडपड आपली वतने सांभाळण्याची. त्यामुळे ते आपापल्या कामासाठी तुळापुरच्या बादशाही छावणीत जमू लागले."[८] औरंगजेबाच्या अशा धोरणाला ताबडतोब प्रतिबंध घालून स्वराज्याचे रक्षण करणे व रयतेमध्ये विश्वास निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे होते. म्हणून रामचंद्रपंतानी ताराबाईच्या सल्ल्याने निर्णय घेऊन स्वराज्याची घडी नीटपणे बसविण्याचे काम हाती घेतले आणि "इ.स. १६९० मध्ये मराठ्यांनी स्वराज्यातील मोगली ठाणी उधळून लावणे, किल्ले

---

७. मोडक, बा.प्र., उपरोक्त., पृ. १५.

८. पसेतुहिंस्वमो., पृ. १११.

हस्तगत करणे, आणि मोगल सैन्यावर हल्ले चढविणे हे प्रकार यशस्वीपणे सुरु केले."[९] मोगलांच्या प्रभावामुळे वतनदार मंडळी आपल्या वतनासाठी म्हणून नाईलाजाने मोगलांशी सहकार्य करीत होती. त्यांना स्वराज्याच्या सेवेला लावणे महत्त्वाचे होते. त्यासाठी राजमंडळाला व ताराबाईला विश्वासात घेऊन रामचंद्र पंताने वतनदारांकडील जुनी वतने कायम केली व नवीन वतने देण्याची आश्वासन दिली. इ.स. १६९० मधील ताराबाईच्या उपस्थितीत पंतानी घेतलेला हा निर्णय स्वराज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. त्यावेळी तो निर्णय ताराबाईने घेतला, असे काही इतिहासकारांनी विशेषत: ब्रिज किशोर[१०] व जदुनाथ सरकार[११] यांनी जे म्हटले आहे, ते योग्य दिसत नाही. कारण ताराबाई ही त्यावेळी केवळ १५ वर्षे वयाची होती. तेव्हा तो निर्णय पंतानीच घेतला. पण तिच्या नावाने जाहीर केला, असे म्हणावे लागेल. पंताच्या या निर्णयामुळे स्वराज्यातील वतनदार मंडळी मोगलांच्याकडून किल्ले परत घेण्यासाठी जोराने कामाला लागली. आणि त्याचा परिणाम म्हणूनच इ.स. १६९० मध्येच जेध्यानी रोहिडा किल्ला मोगलांच्याकडून परत घेतला. राजवाडे यांच्या १५ व्या खंडात लेखांक ३४८ मध्ये या संबंधी पुढील माहिती आहे--

"आपण वतनदार लोक एकनिष्ट सेवा करुन दाखवावी म्हणउनु किले विचित्रगड (रोहिडा) गनिमापासून घेतला व देशहि सोडविला. पुढें ही जमाव करुन गडकोट व देश गनिमापासुनु घेंतो. परंतु स्वामींने कृपाळू होऊनु पेशजी आपला हक चालत होता तेणे प्रमाणे देखील इसाफतीचे गाव चालविले पाहिजेत. ता मजकुरीची लावणी संचणी करुन स्वामिसेवा एकनिष्ठपणे करु." शाके १६१२ वैशाख शुध्द सप्तमी.[१२]

---

९. उपरोक्त., पृ. ११६-११७.

१०. Brij, Kishore., op. cit., pp. 34 - 35.

११. Sarkar, J.N., History of Aurangzib, Vol. V, M.C. Sarkar and Sons, Calcutta, 1924, p. 200.

१२. राजवाडे, वि.का., संपा. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १५, पुणे, १९१२, पृ. ७८-७९.

रोहिडा किल्ला घेतल्याबद्दल सर्जेराव जेध्याची प्रसंशा रामचंद्रपंतानी एकापत्राद्वारे केली आहे. जेध्यांच्याप्रमाणेच इतर वतनदारांनी एकनिष्ट राहून स्वामी कार्य करावे. ते कार्य करून वतनेही मिळवावीत अशा प्रकारचा संदेश महाराष्ट्रातील वतनदारांना दिला होता. त्या संदेशाचा महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे आहे—

"जो कोणी वतनदार एकनिष्ठ धरून येईल, गडकोट हस्तगत करून देईल, या राज्याचे ठायी दृढ निष्ठा धरील आणि स्वामिकार्य करून देईल त्यास इसापती व वतन भाग चालिला असेल तेणेप्रमाणे दुमाला करून लिहोन पाठविणे. सनद सादर होईल तेणे प्रमाणे मजुरा असे."[१३] अशा तऱ्हेने रामचंद्रपंतानी मराठी राज्यात स्वराज्याच्या प्रशासनाचा जम बसविण्याचा आपल्या हुकूमतपन्हा म्हणूनच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून केला होता.

शिवाजी राजाच्या धोरणात रामचंद्रपंतानी केलेला बदल:

छत्रपती शिवाजी महाराज यानी आपल्या सरदारांना त्यांच्या कामगिरी बद्दल वतने किंवा जहागिरी देण्याचे मुसलमानी आमदानातील पध्दत बंद करून पगार देण्याची नवी पध्दत सुरु केलेली होती. शिवाजी आणि संभाजी यांच्या कालात ती चालू राहिली. संभाजीच्या वधानंतर मात्र तिच्या मध्ये बदल करणे भाग पडले. कारण मराठा राज्याला समर्थ नेतृत्व देणारा छत्रपती नव्हता. संभाजीचा मुलगा शाहू मोगलांच्या कैदेत होता. संभाजीचा सावत्र भाऊ, राजाराम हाही त्यावेळी स्वसंरक्षणासाठी जिंजीला गेलेला होता. आणि महाराष्ट्रात छत्रपती शिवाय मराठयांचे राज्य चालू होते. ते राज्य नष्ट करण्याच्या हेतूने

१३. उपरोक्त., पृ. ३७६.

औरंगजेबाने मराठे सरदारांना वतनांची लालूच दाखवून तसेच लाच देवून आपल्याकडे घेण्याचे प्रयत्न चालविले होते. या आमिषाला बळी पडून शिवाजी राजाने दोन जवळचे नातेवाईक अचलाजी आणि महादजी नारायण औरंगजेबाला मिळाले होते, असा उल्लेख मोगलांच्या "अखबारात" आणि "मासिरी-ई-आलमगिरी" मध्ये मिळतो.[१४] अशा परिस्थितीत मराठा राज्य वाचविण्यासाठी वतनाचे अमिष दाखवून मराठा सरदारांना मोगलांच्या उलट लढण्यासाठी प्रवृत्त करण्याखेरीज रामचंद्रपंताजवळ दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे मराठा राजमंडळ आणि ताराबाई यांच्या सल्ल्याने रामचंद्रपंताला परिस्थितीच्या पुढे अगतिक होऊन शिवाजी राजानी वतने देण्याची जी पध्दत बंद केली होती, ती इलाज नसल्याने चालू करावी लागली. या नव्या धोरणाचा अंमल म्हणून पंताने, राजमंडळाच्या संमतीने पहिल्यादा १६९० मध्ये सनदा आणि वतन देण्याचे फर्मान लागू केले.[१५]

सामान्यत: मराठा सरदारांना सनदा देऊन व वतने देऊन मोगलांच्या उलट लढण्याला सिध्द करणे व त्याच वेळी राज्यात व्यवस्था राखणे, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी करण्यास आलेल्या होत्या. त्यानुसार १६८९ पासूनच अंमल झालेला होता. त्यासंबंधी बाजी सर्जेराव जेधे यानी रामचंद्रपंतास १ जून १६८९ रोजी लिहिलेल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की "गनिम मारून काढून आणि साहेबांचे सेवेसी येवून विनंती स्वामीनी अमचे देशमुखीच्या सनदा पाठविल्या अहेत त्यावरून अमचे बहुत समाधान अहे."[१६] वा.सी. बेंद्रे यानी सुध्दा रामचंद्रपंताने हे धोरण सुरु केल्याचे स्पष्ट केले आहे.[१७] रामचंद्रपंतानी या धोरणाचा पाठपुरावा म्हणून अनेकांना सनदा दिल्या आहेत. त्या धोरणाचा पुढील प्रमाणे पाठपुरावा केला आहे--

---

१४. Brij, Kishore., op. cit., p. 40.
१५. सबनीस,के.गो., उपरोक्त., पृ. ३४-३६.
१६. खरे,ग.ह., संपा. शिव-चरित्र साहित्य सहावा खंड, भा.इ.सं.मं., पुणे, १९३७, ले.११२, पृ. ७६-७७.
१७. बेंद्रेराजाराम., पृ. ४१.

"मोगल सैन्याबरोबर झगडा देण्यास स्थानिक देशमुखादी लोक तयार होते. परंतु लोकांचा जमाव करुन त्यांच्या खर्चाचा बोझा खाजगीरीत्या पेलणे त्यांना कठीण होते. त्यामुळे त्यांच्या आपली पुरातन इनामे पुन्हा मिळविण्याबाबत मागण्या येऊ लागल्या आणि त्या मान्य करणे जरुर झाले. कारण या इनामदारांना रोख मोबदला सरकारकडून मिळे तोही मुलुख मोगलाने काबिज केल्यामुळे मिळतनासा झाला होता."[18]

या प्रमाणे १६९० पासून मोठ्या प्रमाणात सनदा, वतने आणि इनाम देणे जरुरीचे वाटल्याने ती देण्यात आली होती. संताजी घोरपडे यांना त्यानुसार तारीख ६ मे १६९० रोजी वाई प्रांतातील बंदोबस्त करुन व गनिमाच्या ताब्यातील प्रदेश हस्तगत करण्यास सांगितले व त्याबद्दल त्याना आश्वासन दिले की,"तुमचा हक्कासिवाय इनामती ये बाबे सुभेदार मजकुरनिहेस आज्ञा केली असे. हे जेणे-प्रमाणे तह देतील त्याप्रमाणे हुजूरहूनही चालवू"[19] सरदारांना व सेवकांना वतने देण्याच्या धोरणाचा एक भाग म्हणून राजारामाच्याकडून तारीख २६ सप्टेंबर १६९१ रोजी रामचंद्रपंतास आजरा महालाचे वतन मिळाले होते.[20] त्यानंतर रामचंद्रपंताची चांगली कामगिरी पाहून आणखीही काही वतने त्याना देण्यात आली होती. त्यामध्ये मावळ प्रांतातील केळवडे,[21] जुन्नर प्रांतातील वांढवली[22] यांचा समावेश होता.

राजाराम महाराजांच्या वतीने सन १६९१ मध्ये रोहिडा खो-यातील लोकांना या वतन धोरणाची माहिती देण्यात आली होती. त्यातील मजकूर खालील प्रमाणे आहे--

---

१८. वेंद्रे, राजाराम., पृ. ४६.

१९. खरे, ग.ह., संपा. उपरोक्त., ले. ११३-, पृ. ७७.

२०. चिटणीस, के.गो., उपरोक्त., पृ. ३७-३८.

२१. उपरोक्त., पृ. ३९.

२२. उपरोक्त., पृ. ४०.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"वतनदारांची वतनें पहिले प्रमाणें चालविण्याची आज्ञा अभयपत्र दिलें पाहिजे, म्हणून विदित केलें. तरी तुम्ही स्वामीचे पायांशी एकनिष्ठ आहां, यावरून स्वामी तुम्हांवर संतोषी आहेत. त्या प्रांतींच्या राज्याच्या [illegible] कार्यभागास स्वामींनी राजेश्री रामचंद्र पंडित अमात्य व शंकराजी पंडित सचिव ठेविले आहेत, त्यांवर मुकत्यार आहे. त्यांहीं तुमचें वर्तमान मनास आणून वतनाचा निर्णय करून सनदा दिधल्या असतील, त्या स्वामीच्याच आहेती. तेणें-प्रमाणें स्वामी चालवितील. आपले समाधान असों देणें. पुढे स्वामी त्या प्रांती येतील तेव्हा तुमचे कुर्जित करतील. अधिक असे. जाणिजे."[23]

वतनांच्या संबंधीचे नियम व उपाय योजना:

पण या धोरणामुळे एक नवाच प्रश्न निर्माण झाला. कारण शिवाजी आणि संभाजी यांच्या काळात भोगवटा असलेल्या जमीनींचा, परंतु सनदा न मिळा-लेल्या जमीनींवर किंवा प्रदेशावर नव्याने सनदा देण्याचे धोरण सुरु केले होते. आणि त्याच वेळी औरंगजेबाकडे फुटून गेलेल्या काही सरदारांना त्या जमिनीची वतने मिळाली होती. आणि रामचंद्रपन्ताने वतने देण्याची पध्दत सुरु केल्यावर औरंगजेबाकडे गेलेले असे काही मराठा सरदार परत आले होते. त्यांनी औरंगजेबाने त्यांना दिलेल्या वतनावरही हक्क सांगितला होता. यामुळे फार गुंतागुंती निर्माण झाल्या. राज्याच्या बंदोबस्ताऐवजी सनदा फार मोठ्या प्रमाणात देण्याची पाळी आली होती. तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी शिवाजी राजमंडळा-च्या सल्ल्याने ताराबाईच्या समक्ष, त्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्याचा व स्वराज्य सांभाळण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातून ठराविक प्रकारचे काही लोकशाही तयार करून हे नियम तयार केले, ते लोकशासनाने खालील प्रमाणे अमलात आणले होते--

23. मोआरि., भाग 2., पृ. 654.

"१. ज्यांनी शंभर करीची सनद घेतली असेल, त्यास निम्मे द्यावे.

२. ज्यांनी जमिनीची सनद घेतली असेल त्यांस निम्मे द्यावे.

३. ज्यांनी गांव, मुकाशे, यांच्या सनदा आणिल्या असतील, त्यांतील ज्यांस गांव सरेसारखे (जे लोक गांव भोगण्या योग्य) असतील त्यासच गांव द्यावे; बाकीच्यांस ऐवजमात्र द्यावा. आणि ही देणगी कार्यभाग जाणून द्यावी.

४. बादशाहाकडे प्रांत नसतां मिळविलेले फर्मानाबद्दल कांही देऊं नये.

५. देशमुख, देशपांडये वगैरे मोठ्या उत्पन्नाबद्दल बादशाहाचे फर्मान, तसेच शिवाजी व संभाजी राजे यांची आज्ञापत्रे वगैरे असून भोगवटा असल्यास ही उत्पन्ने द्यावी. तसे नसल्यास कांही देऊ नये."[२४]

रामचंद्रपंताने अशा त-हेने स्वराज्याच्या संरक्षणासाठी नवीन धोरणाचा अवलंब करून राज्यात विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपले कर्तव्य बजावत असताना तो सदा जागरूक आणि सर्वत्र अहर्निश नजर ठेवून होता. शत्रुवर पाळत ठेवून सावध वागण्याचा सल्ला त्याने सर्व सरदारांना दिला होता. तसेच जे सरदार पराक्रम गाजवून चौथाई व सरदेशमुखी वसूल करतील त्यांना किताब व जहागि-यांच्या सनदा देण्याची आश्वासनेही दिली होती. आणि शत्रूच्या प्रांतात जाऊन मुलूख कसा जिंकावा व राज्याची वृध्दी कशी करावी, या विषयी सविस्तर सूचना केल्या होत्या. तशा सूचना करताना त्याने सांगितले, "पाळेगारीने किल्ल्यांचा वगैरे आश्रय करून, झाडीत रहावे, तेथून मुलखांत अंमल बसवावा, घ्यावा, फिरून पळावे, फिरून येऊन प्रदेश काबीज करावा, पथकांतील लोकांनी संख्या वाढवावी."[२५] या धामधूमीच्या काळात एखादा सरदार फुटून मोगलांच्याकडे गेला तर जास्त

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

२४. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ४३.

२५. आज्ञापत्र/राजाराम., पृ. ५१.

नुकसान होण्याची भिती होती. मराठ्यांचे सरदार फोडण्याचा उद्योग बादशहाने चालूच ठेवलेला होता. तेव्हा त्या संकटातून मार्ग काढण्यासाठी, आपल्या प्रशासनाचा एक भाग म्हणून रामचंद्रपंतानी फुटून गेलेल्या सरदारांना परत आणण्याचे हर प्रकारे उपाय योजले होते. तरीही काही फुटून फितुरी करीत असत. त्यांच्या विरूध्दही कडक उपाय योजले होते.[२६] त्यामुळे फितुरी करणाऱ्यांची संख्या कमी होण्यास मदत झाली होती.

औरंगजेब बादशाहाकडून नवनव्या फौजा वेगवेगळ्या सरदारांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचा बिमोड करण्यासाठी पाठवल्या जात असत. पण त्या सर्वांना रामचंद्रपंताने यशस्वीपणे तोंड दिले. त्यासाठी सरदार व शिपायी यांना बक्षिसे व उत्तेजन दिले. त्यांच्याकडून वेगवेगळी कामे करून घेतली. आणि जेथे जेथे मोगल सैन्याने मराठ्यांचा नाश केला होता, त्या त्या ठिकाणी पुन्हा मराठ्यांचा अंमल सुरु करून तेथील मराठा सरदारांची नेमणूक केली. कोकण व घाट बांधारीचे किल्ले आणि मुलूख यांचे संरक्षण केले. तसेच राजारामासाठी जिंजीकडे वरचेवर मदत पाठविली. आणि मराठा राज्यात सन १६९४ - ९५ च्या दरम्यान नवा विश्वास निर्माण केला.[२७]

प्रशासनाची जाबाबदारी पार पाडत असताना रामचंद्रपंताला काही मराठा सरदारांच्या उलट कडक उपाय योजना करावी लागली होती. त्यामुळे १६९३ च्या सुमारास संताजी घोरपडे व रामचंद्र पंत यांच्यामध्ये बिनसले होते. तरीही मराठा राज्यात फुट पडू द्यावयाची नाही, हे धोरण समोर ठेवून रामचंद्र पंताने संताजीला जिंजीहून परत आल्यावर शंकराजी पंताकडे नेमले व आपल्याकडे धनाजी जाधवाला घेतले.[२८] तसेच कोणतीही मोगलांना मिळू नये, राज्यातील व्यवस्था आणि वसूल

---

२६. <u>उपरोक्त</u>.
२७. गोरे, रा.म., <u>उपरोक्त</u>., पृ. ४६.
२८. <u>केंद्रेराजाराम</u>., पृ. २६७.

पुरस्कीतपणे राहावयाची खबरदारी घेतली होती. मोगलांना मिळणाऱ्या मराठा सरदारांच्या विरुध्द कडक धोरण स्वीकारले होते. आणि जर, सरदेसाई सांगतात त्याप्रमाणे एखादा मराठा सरदार किंवा गृहस्थ मोगलांना फितूर झाल्याचे उघडकीस येताच त्याचे कुटुंब, नातेवाईक आणि बायका मुले या सर्वांना अटक केली जात असे व अत्यंत कडक रीतीने वागवले जात असे. फितुरांच्या नातेवाईकांना व कुटुंबियांना अशा त-हेने असहाय्य पध्दतीची वागणूक दिली जात असल्याने तिचा योग्य तो परिणाम इतरांच्यावर होत असे व फितूरी करण्याचे किंवा द्रोह करण्याचे तथा शत्रूच्या बाजूला जाऊन कागाळी करण्याचे धाडस करण्याची हिंमत कोणाला होत नसे.[२९] वाईच्या पिसाळ देशमुखानी रायगड किल्ला मोगलांना देऊन टाकला होता. म्हणून रामचंद्रपंतानी पिसाळ देशमुखांना अत्यंत कठोरपणाने अनेक वर्षे वागविले आणि त्यांचे घराणे धुळीला मिळवून दिले. अर्थात त्या पिसाळ देशमुखानी मुसलमान धर्म स्वीकारल्याने बादशाहाने त्यांची योग्य सरबराई केली होती. जुन्नरच्या बेग कुटुंबाने तशाच प्रकारचा द्रोह केला होता म्हणून त्यांनाही रामचंद्रपंताने पिसाळ देशमुखाच्या पध्दतीनेच वाईट त-हेने वागविले होते.[30] या प्रमाणे राजारामाच्या पश्चात रामचंद्रपंतानी महाराष्ट्रामध्ये प्रशासनाची घडी बसविली होती.

राजारामला सहाय्य:

रामचंद्रपंताकडे राजाराम महाराजांना जिंजीला पाठविल्यावर दोन प्रकारे कामगिरी बजावी लागली. पहिली महाराष्ट्रात व्यवस्था पहाण्याची व दुसरी जिंजीकडे गेलेल्या राजारामास कोणत्याही प्रकारे मोगल सैन्याने उपद्रव होऊ देऊ

---

२९. SGSNHM., p. 340.

३०. राजवाडे, वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड तिसरा, कोल्हापूर, १९००, पिसाळ कागदपत्रे नंबर ५६-६४, पृ. ५०-६८.

नये याची. अशा प्रकारे राजाराम जिंजीला असताना पंताना दोन वेगवेगळ्या जबाबदाऱ्या एकच वेळी पार पाडाव्या लागल्या होत्या. त्यात जर कमी जास्त झाले असते वा राजारामास दगा फटका झाला असता तर त्याची सर्व जबाबदारी रामचंद्र पंतावरच पडली असती आणि सर्व टीकाकारांनी रामचंद्रपंतालाच "हुकूमतपन्हा" या नात्याने जबाबदार धरले असते.

जिंजी संबंधीचे कार्य:

राजाराम महाराज जिंजीमध्ये असताना केलेली उपाय योजना व राजाराम महाराज जिंजीहून आल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व मराठा सरदारांना संघटीतपणे ठेवण्याचे केलेले कार्य अशी राजाराम महाराजाच्या कारकीर्दीतील पन्ताची दोन महत्त्वाची कार्ये आहेत. या दोन महत्त्वाच्या कार्यामध्ये जिंजी-संबंधीचे कार्य पहिले आणि अति महत्त्वाचे होते. या कार्याचा महत्त्वाचा भाग प्रथमत: देण्यात आलेला आहे.

संभाजी महाराजांच्या वधानंतर त्यांचा सावत्र भाऊ राजाराम हा १९ वर्षाचा होता व त्याला गादीवर बसवून मराठ्यांचे राज्य चालविण्याचा मराठ्यांनी निर्धार केलेला होता.[३१] हा निर्णय मोगलांना कळला असावा, म्हणून त्यांनी संभाजीला ठार मारल्यावर मराठ्यांची राजधानी रायगड येथे राजाराम होता, म्हणून त्या किल्ल्याला २५ मार्च १६८९ रोजी वेढा घालण्यास झुल्फिकारखान यास पाठविले.[३२] पण राजाराम रायगडाहून वेढा चालू असताना निसटून पन्हाळगड येथे आला व तेथून पुढे १५ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीला जाऊन पोहोचला होता. त्याचा हा प्रवास खुष्कीच्या मार्गाने व काही वेळा समुद्रमार्गाने झाला होता.[33]

---

३१. केळूस्कर राजाराम., पृ. २८-३०.
३२. केळूस्कर राजाराम., पृ. ३०.
३३. Brij, Kishore., op. cit., p. 26.

राजाराम जिंजीला पोहचला खरा पण मोगलांच्या संकटातून काही मुक्त झालेला नव्हता. मोगलांनी राजारामाचा पिच्छा अगदी जिंजीपर्यंत चालू ठेवला होता. मोगल राजारामाला येनकेन प्रकारे पकडण्याच्या प्रयत्नात होते. त्यांचा हा मनसूबा कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ द्यावयाचा नाही, असा मराठ्यांचा निर्धार होता. या निर्धाराचे शिल्पकार रामचंद्रपंतच होते. त्यानी तसा निर्धार केला नसता तर मराठा राज्यच संपुष्टात येणार होते. म्हणून राजारामाचा पिच्छा करणाऱ्या मोगल सैन्याचे मनसुबे उध्वस्त करण्याचा उद्योग हाती घेणे अत्यंत महत्त्वाचे होते. रामचंद्रपंताने त्यासाठी ताबडतोब उपाय योजना केली होती.

सेतु माधवराव पगडी यानी केशव पंडिताच्या "राजाराम चरितम्" ग्रंथाच्या आधारे राजाराम जिंजीस कसा गेला व औरंगजेबाने त्याचा पाठलाग करण्याचे कोणते उपाय योजले, हे, याची माहिती पुढील प्रमाणे दिली आहे--

"राजारामा बरोबर मानसिंह मोरे, प्रल्हाद निराजी, कृष्णाजी अनंत सभासद, नीलकंठ मोरेश्वर व बहिरो मोरेश्वर आणि त्यांचा कारभारी उध्दव, नीलकंठ कृष्ण, खंडो बल्लाळ व इतर कायस्थ मंडळी, बाजी कदम, खंडोजी कदम, केशव पंडित इत्यादी मंडळी होती. राजाराम हा कर्नाटकाच्या वाटेवर आहे हे पाहताच औरंगजेबाने त्याचा पाठलाग करून त्याला पकडावे असे तातडीचे हुकूम सोडले."[३४]

रायगड जिंकल्यावर झुल्पिकारखानावर औरंगजेबाने राजारामाच्या पाठलागाची कामगिरी सोपविली. त्यानुसार तारीख 30 नोव्हेंबर १६८९

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३४. पसेतुहिंम्वमो., पृ. १०१-१०२.

रोजी झुल्फिकारखानाने महाराष्ट्र सोडला व तो जून १६९० च्या आसपास जिंजीला जावून पोहोचला. जातांना त्याने आपल्याबरोबर शाहजादा कामबक्ष व आसदखान यांना नेले होते. पण त्याने तिकडे "थोडी बहुत धान्य सामुग्री आणली होती खरी परंतु ती थोडयाच कालात संपून गेली व सैन्याचे पूर्ववत हाल होऊ लागले."[३५] अशा परिस्थितीत जिंजीला पोहोचल्यावर झुल्फिकारखानाने ऑगष्टच्या आखेरीस किंवा सप्टेंबर १६९० च्या प्रारंभी मराठ्यांच्या उलट मोहिम सुरु केली.[३६] वा.सी. बेंद्रे यानी सुध्दा फ्रेंचांच्या कागदपत्राध्दारे झुल्फिकारखानाने ऑगष्ट महिन्यात राजारामाच्या विरुध्द मोहिम उघडल्याचे स्पष्ट केले आहे. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याच्या रोजनीसीतील त्याबाबतचा संदर्भ ते खालीलप्रमाणे देतात —

"ऑगष्ट १६९०: मोगल लोकानी लक्ष्मीनायकाचा पराभव केला तेव्हा तो लांब मजल मारुन पळून गेला. ही बातमी ऐकून जिंजीच्या मराठा सरकारचा घबराट उडाला. जिंजीतील लोक बाहेर पळून जाऊ लागले. खुद्द राजाराम जिंजी सोडून जाण्याचा बेत करितो. पण ब्राम्हणप्रधान त्यास विरोध करितात. तुम्ही जिंजी सोडून जाल तर मग सगळाच घात झाला असे होईल हे त्यांचे म्हणणे."[३७]

जिंजीत असताना राजाराम महाराज आर्थिक अडचणीत होते. झुल्फिकारखानाच्या पाठलागामुळे त्यांच्या अडचणीतभरच पडली. त्यामुळे मराठा सैन्य आणि सरदार यांच्यासाठी परदेशीय कंपन्याच्याकडून पैसा मिळविण्याचाही त्यानी प्रयत्न केला.[३८] इ.स. १६९० च्या ऑक्टोबरात झुल्फिकारखानाच्या सैन्याने जिंजीला वेढा दिला. नंतर १६९२ मध्ये सुलतान कामबक्ष व मुख्य वजीर आसदखान त्याच्या

---

३५. बेंद्रेराजाराम., पृ. १९६.

३६. Brij, Kishore., op. cit., p. 45.

३७. बेंद्रेराजाराम., पृ. ७७.

३८. उपरोक्त., पृ. १५०.

मदतीला आले. ही परिस्थिती मराठे ओळखून होते. पण १६९१ च्या नोव्हेंबरात म्हणजे कामबक्ष व आसदखान झुल्फिकारखानाला येऊन मिळेपर्यंत त्याची परिस्थिती वाईट होती. त्यापूर्वी जिंजीतून राजाराम महाराज दक्षिण कर्नाटकाकडे गेले होते. ते फेब्रुवारी १६९१ मध्ये जिंजीला परत आले होते. नेमाजी शिंदे, मानकोजी पांढरे व नागोजी माने हे दोन हजार स्वारासह ता. २३ नोव्हेंबर १६९० ला राजारामाच्या मदतीला आलेले होते. अशाही परिस्थितीत झुल्फिकारखानाने लढा चालू ठेवला होता. पण त्याला यशाची खात्री नव्हती. म्हणून त्याने नोव्हेंबर १६९१ मध्ये राजारामाला लिहून कळविले की, "वेलोर तुम्ही आपल्याकडे ठेवून जिंजी माझ्या ताब्यात करा. एकदा कामबक्ष दाखल झाल्यावर माझ्या हाती सत्ता राहणार नाही."[३९] पण मराठ्यांनी जिंजी लढवण्याचा निर्णय घेतला. पुढे तंजावरकरांनी राजारामास मोठी रक्कम पाठविली. त्यामुळे मराठ्यांना जोर आला. पण पुढे कामबक्ष आल्यानंतर मोगलांची बाजू बळकट झाली.[४०]

अशा कठीण कालामध्ये रामचंद्रपंताने राजमंडळाच्या सहाय्याने धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांची रवानगी १६९२ च्या अखेरीस जिंजीकडे केली. त्यामुळे तेथील मराठ्यांचे सैन्य तीस हजारावर गेले आणि मोगल सैन्य अडचणीत आले. परिणामी मोगलांनी १६९३ च्या जानेवारीत जिंजीचा वेढा उठविण्याचे ठरविले. पण तशाही रणधुमाळीच्या कालात झुल्फिकारखान व राजाराम महाराज, या दोघांमध्ये गुप्तपणे सलोखा करण्याचे प्रयत्न चालल्याचे स्पष्ट झालेले आहे. मराठा सरदारांना ही गोष्ट कळल्यावर ते राजाराम महाराजावर

---

३९. उपरोक्त., पृ. १५२.

४०. उपरोक्त., पृ. १५३.

नाराज झाल्याचे बेंद्रे यानी स्पष्ट केले आहे.[४१] कारण धनाजी व संताजी यांच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्याने हैद्राबादी कर्नाटकातील मोगलांचा सर्व प्रदेश जिंकून केशव रामन याला मराठयांचा सुभेदार म्हणून नेमलेले होते. आणि त्याच्या द्वारे औरंगजेबाच्या वतीने जिंजीकडे जाणारी सर्व रसद बंद करून झुल्फिकारखान व मोगली सैन्य अडचणीत आणले होते. या परिस्थितीची माहिती खाफीखानाने सुध्दा दिलेली आहे.[४२] त्यानेही झुल्फिकारखानाने राजारामाशी संधान बांधण्याचा प्रयत्न चालू केला होता याची माहिती दिली आहे.[४३] संताजी घोरपडे याना ही बाब आवडली नाही. आणि त्यानी कर्नाटक सोडून महाराष्ट्रात येता येता कांजीवरम व त्रिचनापल्ली, या ठिकाणी मराठयांचे प्रभुत्व प्रस्थापित केले होते.[४४] तर अशा या अत्यंत बिकट काळामध्ये रामचंद्रपंतानी महाराष्ट्रातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवून राजाराम महाराजांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व कुमक पाठविली होती. आणि जिंजीकडे मोगलांच्या उपद्रवामुळे राजाराम महाराजाच्या जीवाला कोणताही अपाय होणार नाही, तथा छत्रपती घराण्यातील सर्व लोक तेथे सुरक्षित राहतील, याची खात्री करून घेऊन सन १६९४ मधे ताराबाई व इतर राण्यां यांना जिंजीला सुरक्षितपणे पोहचते केले होते. पंताच्या आयुष्यातील ती एक अत्यंत महत्वाची कामगिरी होती.

ताराबाई जिंजीला पोहोचली तेव्हा जिंजीमध्ये मराठयांची फळी बळकट होती. राजारामाने तेथून राज्यकारभार करावा असे वातावरण होते. पण त्याचवेळी रामचंद्रपंताला महाराष्ट्रामध्ये योग्य प्रकारे मोगलांच्या उलट सामना

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

४१. उपरोक्त., पृ. १५४.

४२. Brij, Kishore., op. cit., p. 46.

४३. Sarkar, J.N., House of Shivaji, Calcutta, 1940, pp.218-219.

४४. आपटे, द. वि., व तिवेकर, स. म., संपा. उपरोक्त., पृ. ३६-३७.

करण्यासाठी खास अधिकार पाहिजे होते. पण जिंजी येथे असलेले प्रल्हाद निराजी याना सर्व सत्ता आपल्या हाती हवी होती. ताराबाई जिंजीला पोहचण्यापूर्वी मराठा सरदारात अनेक खलबते झालेली होती. शंकराजी मल्हार १६९० मध्ये निवृत होऊन काशीला गेलेले होते आणि प्रल्हाद निराजी, जिंजी येथेच १६९४ मध्ये मरण पावले होते.[४५] प्रल्हाद निराजीने आत्महत्या केल्याचे जे सांगितले आहे, ते योग्य नाही.[४६]

ताराबाई जिंजीला पोहचल्यावर ब्रिज किशोर यांच्या मताप्रमाणे राजारामाच्या मंत्रिमंडळात उलथापालथ झालेली होती. ताराबाईंनी महाराष्ट्रात रामचंद्रपंताबरोबर चार वर्षे काम केलेले होते. तेव्हा रामचंद्रपंताच्या धोरणानुसार ताराबाईने हा बदल करायला लावला असावा, असे ब्रीज किशोराचे म्हणणे आहे. त्यामुळेच प्रल्हाद निराजी आणि शंकराजी मल्हार यांना संपवून रामचंद्र-पंतानी महाराष्ट्र व कर्नाटकात स्वत:चे प्रभुत्व प्रस्थापित केले होते. आणि कदाचित् त्यामुळेच ताराबाई आणि रामचंद्रपंत यांच्यात राजाराम महाराजांच्या मृत्यूपर्यंत कसलेच मतभेद झालेले नव्हते.[४७]

मोगलांच्या एकाच वेळी महाराष्ट्र आणि कर्नाटक येथे कारवाया चालू होत्या. सन १६९४ मध्ये त्यांनी पन्हाळगडचा वेढा उठवून तोरणा किल्ला जिंकला होता.[४८] तर त्याच सुमाराला शहाजादा आज्जमचा नातू बेदारबख्त, हा धारवाड व बेळगाव या भागात लढत होता.[४९] तसेच तंजावरकरांवर झुल्फिकारखानाने १६९४ मार्च मध्ये अंमल बसला होता. व जून १६९४ मध्ये पालम्कोटयाचा किल्ला घेतला होता.[५०]

---

४५. करवीरराजाराम., पृ. ७२.

४६. Brij, Kishore., op. cit., p. 52.

४७. Ibid., pp. 52 - 53.

४८. पारसनीस,द.ब., संपा. इतिहास संग्रह, (मराठी) मासिक,१९०९ ते १९११, सातारा, पृ. २८.

४९. पसेवुहिंस्वमो., पृ. १५९.

५०. उपरोक्त., पृ. १६०.

मोगलांच्या सैन्याने महाराष्ट्र व कर्नाटकात एकाच वेळी दोन्हीकडे अशा मोहिमा उघडल्याने मराठ्यांच्यापुढे सुध्दा गंभीर प्रश्न होता. पण रामचंद्रपंतानी या परिस्थितून सावधपणे मार्ग काढला. त्यासाठी त्याने १६९५ च्या दसरा सणाच्या-वेळी मराठा राजमंडळाची बैठक विशाळगडावर बोलवली आणि सर्वांना विश्वासात घेऊन मोगलांचे विरुध्द दोन्ही प्रदेशात कसे तोंड द्यावयाचे, यासंबंधी निर्णय घेतला. सरदेसाई या बाबतची हकीकत पुढील प्रमाणे देतात--

"रामचंद्रपंतानें स. १६९५ च्या दसऱ्यास सर्व सरदारांना जमा बोलावून मोगलांवर संगीन चढाई करण्यासंबंधाने वाटाघाट केली आणि मराठे सरदारांचे गट पाडून त्यांस निरनिराळ्या कामगिऱ्या वाटून दिल्या. मुख्य उद्देश चहूं बाजूंनी मोगली प्रदेशांत शिरुन सर्वत्र त्यांस धुव्वा उडवून द्यावा असा बेत ठरला. कांही सरदारांनीं जुन्नरच्या मार्गानें वऱ्हाडांत शिरुन उत्तरेकडील प्रदेश उद्ध्वस्त करावा आणि कांहींनीं तुंगभद्रेच्या प्रदेशांत दक्षिणेकडे जाऊन जिंजीवरचा दाब उठवावा अशी ही योजना होती. तदनुसार संताजी घोरपडे विजापूर प्रांतातून दक्षिणेकडे गेला आणि धनाजी जाधव इकडे नजर ठेवीत सातारा आकलूजचे दरम्यान फिरत राहिला. बादशहास मराठ्यांच्या या प्रचंड चढाईची बातमी लागून त्यानें हिम्मतखानास संताजीचे पाठीवर रवाना केले, त्यास दाद न देतां संताजी मोठ्या वेगानें तुंगभद्रा उतरुन पलिकडे गेला. त्याबरोबर धनाजी सुध्दां दुसऱ्या मार्गानें तिकडेच गेला. यावेळी औरंगजेब ब्रम्हपुरीस होता."[५१]

रामचंद्रपंताने सर्वांच्या संमतीने परंतु स्वत:च्या नेतृत्वाखाली, राजाराम महाराजांच्यावर जिंजी येथे आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला होता. तामिळनाडूमधील लहान-सहान राज्य जिंकल्यावर वेलोर

---

५१. मराठीरियासत., पृ. ७६.

येथील मराठ्यांच्या किल्ल्याला झुल्फिकारखानाने नोव्हेंबर १६९५ मध्ये वेढा घातला होता. तेव्हा त्याच्या विरुध्द धनाजी व संताजी यांना तिकडे पाठविण्यात आले. औरंगजेबाला मराठ्यांच्या या निर्णयाची माहिती झाली असावी. म्हणून त्याने खाफीखानाने सांगितल्याप्रमाणे संताजीच्या विरुध्द रुहुल्लाखान, सफशिकनखान खाफी, महंमद कामबक्षाचा बक्षी महंमद मुरादखान इत्यादीना पाठवले होते.[५२] तथापि संताजीने अत्यंत कौशल्य पूर्ण रीत्या कासिमखान आणि त्याच्या पार्टीचा पूर्णपणे विमोड केला. त्यामुळे म्हैसूर प्रांतातील दुड्डेरी येथे कासिम खानाने २० नोव्हेंबर १६९५ मध्ये मराठा शत्रूच्या कडून अपमान करुन घेण्यापेक्षा आत्महत्या केली. या लढाईमध्ये मोगल सैन्याला अत्यंत वाईट प्रकारे वागण्यात आले. परंतु तशाही परिस्थितीत मराठ्यांनी त्याना जीवदान दिले होते.[५३] त्यानंतर संताजीची ख्याती सर्व कर्नाटकात पसरली होती. ब्रीज किशोरच्या मताप्रमाणे संताजीच्या शौर्याचा तो परम उच्चांक होता.[५४] पुढे संताजीने एकाच महिन्यात बसवापट्टण येथे हिंमतखानाला २० जानेवारी १६९६ रोजी ठार मारले. त्यामुळे मोगलांनी आपले लक्ष संताजी घोरपडे याच्यावर केंद्रीत केले. पुढे संताजीच्या मदतीला धनाजी जाधव आले. त्यामुळे झुल्फिकारखान अडचणीत आला. पण तशातच झुल्फिकारखानाने संताजीचा अरनी येथे १६९६ च्या एप्रिल महिन्यात पराभव केला. पण धनाजी जाधवामुळे झुल्फिकारखानाचा विजय हंगामी स्वरुपाचा होता. दुर्दैवाने मात्र त्याच वेळी धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे, यांच्यातील वैर विकोपाला गेले होते. त्यामुळे संताजी आणि धनाजी या दोघांनी एकत्रपणे लढून मोगलांचा पराभव करण्याऐवजी ते दोघे आपापसातच लढत असत. या परिस्थितीत रामचंद्रपंत समेट घडवून आणू

---

५२. पसेतुमिंस्कागो., पृ. १६१-१६२.

५३. SJNSJ., pp. 230 - 231.

५४. Brij, Kishore., op. cit., p. 50

शकला असता. पण तो महाराष्ट्रात दूर अंतरावर होता. संताजी घोरपड्यानी जिंजीचे संरक्षण केल्यावर त्याने राजाराम महाराजाकडून जबरीने मोठ्या अधिकाराची मागणी केली आणि धमकावले की राजारामाचे राजेपण केवळ संताजीवर अवलंबून आहे.[55] त्याच्या अशा अरेरावीच्या वागण्याचा राजाराम महाराज आणि त्याच्या राण्या, विशेषत: ताराबाई यांच्यावर गंभीर परिणाम झाला. ब्रिज किशोर यांनी या बाबतीत विल्कीजचे मत पुढे करून असे सांगितले आहे, की त्या संताजीचे राजाराम महाराजाला छत्रपती पदावरून काढून टाकण्याचीही धमकी दिली होती.[56] आणि याचा परिणाम म्हणूनच की काय, राजाराम महाराजानी रामचंद्रपंताना पत्र लिहून संताजी घोरपडे यांना त्याच्या अधिकार पदावरून काढून टाकण्याविषयी तारीख २७ ऑक्टोबर १६९६ रोजी कळविले होते.[57] आणि दुर्दैवाने रामचंद्रपंताने संताजी व धनाजी यांना समेट घडवून आणण्यासाठी तसेच राजाराम महाराज आणि संताजी घोरपडे यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी, काही कृती केली नाही, असे दिसते.[58] त्यामुळे संताजी सारखा महान सेनापती विश्वासघाताने मारला गेला.

<u>राजारामाचे महाराष्ट्रात आगमन:</u>

राजाराम महाराज जिंजीमध्ये असतानाच संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यामधील वैर शिगेला पोहोचले होते. मराठ्यांच्यातील अशी आपापसात झालेली फूट झुल्फिकारखानाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. पण तो सुध्दा सात-आठ वर्षे जिंजीमध्ये मराठ्यांच्या उलट लढून बेरीला आला होता. शिवाय

---

५५. मावजी, पु. वि., व पारसनीस, द. ब., ) संपा. सनदा व पत्रे, पुणे, १९१३, पृ. ८५.

५६. Brij, Kishore., op. cit., p. 24.

५७. पेशवे दप्तर, ३१-६०.

५८. करवीरराजाराम., पृ. ८३.

मोगल बादशाहा औरंगजेब अतिशय वृध्द झालेला होता. त्याच्या धोरणा-विषयी झुल्फिकारखानाला तेवढी आस्था राहिलेली नव्हती. त्यामुळे तो सुध्दा स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करण्याच्या विचारात होता. मार्टिनच्या कागद-पत्रामध्ये तशा प्रकारची माहिती १६९६ मध्ये मिळते.[५९] तेव्हा झुल्फिकारखानाला जेव्हा औरंगजेबाविषयी अनास्था निर्माण झाली होती, त्याच वेळी राजाराम-सुध्दा जिंजीमध्ये राहून अडचणीत अडकलेला होता. म्हणजे राजाराम व झुल्फिकारखान या दोघानांही जिंजीच्या प्रकरणातून मार्ग काढावयाचा होता. आणि नेमक्या त्याच सुमाराला राजारामाने आपला कर्ण नावाचा मुलगा झुल्फिकारखानाच्या वॉदिवास येथील छावणीत ऑगस्ट १६९७ मध्ये सलोखा करण्यासाठी पाठविला होता. झुल्फिकारखानाने राजारामाच्या तहाच्या प्रस्तावाला मंजुरीसुध्दा दिली होती. परंतु औरंगजेबाला ती गोष्ट मान्य झाली नसल्याने त्याने जिंजीचा किल्ला सर करण्यासाठी पुन्हा हुकूम सोडला. झुल्फिकारखानाने राजारामाचा मुलगा राजारामाकडे ऑक्टोबर १६९७ मध्ये परत पाठवून नोव्हेंबर १६९७ मध्ये जिंजी घेण्याचा लढा पुन्हा उमेदीने चालू केला.[६०] आणि ता. ३० डिसेंबर १६९७ रोजी झुल्फिकारखानाने जिंजी जिंकून घेतली. पण त्यापूर्वी ता. २६ डिसेंबर १६९७ ला राजाराम जिंजीवरून निसटून वेलोरे येथे येऊन पोहोचले होते. त्यानंतर तेथून तो २२ फेब्रुवारी १६९८ रोजी धनाजी जाधवाच्या बरोबर वेलोरहून महाराष्ट्रातील खेळणा किल्ला येथे येऊन पोहोचला.[६१] राजाराम महाराजांचा वेलोर ते महाराष्ट्र हा प्रवास अत्यंत धोक्याचा असूनही रामचंद्रपंताने योग्य उपाय योजना केल्यामुळे सुरक्षित पणे पार पडला होता. झुल्फिकारखानाच्या बरोबरीचा तह फिसकटल्यावर जिंजीतून सुटका करून घेणे, राजारामाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांनी रामचंद्रपंताना पत्र पाठवून मराठा सैन्याची कुमक जिंजीला बोलवून घेतली होती.

---

५९. Martin., Meoires III - 286 date 5-11-1696.

६०. Brij, Kishore., op. cit., pp. 55 - 56.

६१. आपटे, द. वि., व दिवेकर, स. म., संपा. उपरोक्त., पृ. ६६.

रामचंद्रपंताने तात्काल तशी उपाय योजना केली होती, म्हणून राजारामाला मोगलांच्या तावडीतून महाराष्ट्रात निसटून येणे शक्य झाले.[६२] राजाराम वेलोर सोडून महाराष्ट्राकडे निघून आल्यावर मोगलांनी त्याचा पाठलाग केला परंतु त्यांना यश आले नाही.[६३]

राण्यांना जिंजीहून महाराष्ट्रात आणले:

राजाराम महाराष्ट्रात निघून आल्यावर राजारामाच्या राण्या जिंजीमध्येच अडकून पडलेल्या होत्या. त्यांना सोडवून सुखरूपणे महाराष्ट्रात आणणे अत्यंत कठीण व जोखीमीचे काम होते. त्यासाठी खास योजना करणे गरजेचे होते. या संदर्भात अजून फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच राजाराम महाराज व झुल्फिकारखान यांच्यातील केवळ मैत्रीमुळे झुल्फिकारखानाने राजारामाचा कबिला म्हणजे ताराबाई व इतर राण्या यांना गणोजी शिर्क्यांच्या स्वाधीन केले, असे जे सांगितले जाते, ते योग्य वाटत नाही. कारण याच झुल्फिकारखानाने बादशहाचा हुकूम शिरसावंद्य मानून इच्छा नसतानाही जिंजीवर डिसेंबर १६९७ मध्ये पुन्हा जोराने हल्ला केला होता आणि जिंजी जिंकली होती. त्याला राजारामाच्या राण्यांच्या विषयी आपुलकी असावी असे काही नव्हते. परंतु अशाही परिस्थितीत ताराबाई व इतर राण्या सहीसलामत जिंजी सोडून आल्या होत्या, ही सत्य गोष्ट आहे. या बाबतीत झुल्फिकारखानाने खंडो बल्लाळ, गणोजी शिर्के, गिरजोजी यादव यांच्याशी मसलत केल्याचे सांगितले जाते. या मसलतीच्यामुळेच राजाराम महाराज सुध्दा जिंजीच्या किल्ल्यातून गुप्तपणे गणोजी शिर्क्यांच्या सहाय्याने आपल्या २० लोकांसह निसटून आलेले होते,[६४] हे खरे आहे.

---

६२. केंद्रेराजाराम., पृ. २०२.

६३. उपरोक्त., पृ. २०६.

६४. काजी,पु.वि., व पारसनीस,द.ब., ) संपा. उपरोक्त-सनदा व पत्रे., पृ. २१८-२१९.

भीमसेन सक्सेना, हा जो मोगलांच्या नोकरीत व झुल्फिकारखानाच्या छावणीत जिंजीच्या लढयाच्या वेळी हजर होता. त्याने जिंजीच्या लढयाचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. जो पर्यंत संताजी घोरपडे तिकडे होता तोपर्यंत आपल्याला धोका नाही, अशी राजारामाची खात्री होती. कारण संताजी घोरपडे हा झुल्फिकारखानाच्या तुलनेत मोठा जबरदस्त सेनापती होता. त्याच्या विरुध्द लढण्याची हिंमत झुल्फिकारखानाला नव्हती. पण तो जून १६९७ मध्ये आपसातील दुहीमुळे मारला गेल्याने, मोगलांना व झुल्फिकारखानाला सुध्दा नवे सामर्थ्य प्राप्त झाल्यासारखे झाले. आता राजाराम महाराजांना सुध्दा जिंजीत राहाणे धोक्याचे झाले. म्हणून राजाराम महाराजानी महाराष्ट्रात निघून आल्यावर झुल्फिकारखानाने जिंजीचा किल्ला जिंकला आणि राजारामाची बायका-मुले त्याच्या ताब्यात सापडली. या संबंधीचा वृत्तांत भीमसेन सक्सेनाने पुढील प्रमाणे दिल्याचे पगडी सांगतात--

"राजारामाच्या बायकामुलांचे झुल्फिकारखानाने समाधन केले. . त्यांच्या-साठी त्याने पालख्या पाठविल्या. ती सर्व माणसे किल्ल्याबाहेर आली. झुल्फि-कारखानाने त्यांची काळजीपूर्वक निघा राखली... त्याने माणसे पाठवून राज-गिरीचा ताबा घेतला... किल्यास स्त्री-पुरुष मिळून एकंदरीतचार हजार माणसे होती. पण त्यात लढवय्ये असे फार थोडे होते... युध्दात भाग घेणा-यापैकी राजारामाच्या अनेक सैनिकांना ठार मारण्यात आले."[६५]

ताराबाई आणि इतर राण्या तथा मराठा सैन्यांवर अशी कठीण परिस्थिती गुदरली होती. सरदेसाई यानी सांगितल्याप्रमाणे हे संभवनीय आहे, की गणोजी शिर्के आणि मोहिते यांनी आपल्या कुटुंबांतील ही बायका मुले असेत, असे सांगून झुल्फिकारखानाकडून त्यांची सुटका करुन घेतली होती.[६६] पण

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

[illegible]

६५. प्रसेतुहिंस्वमो., पृ. १८०.

६६. सगोसरराजाराम., पृ. ७३.

चिटणीस बखरीत या संबंधीची आलेली हकीकतच अधिक विश्वासनीय वाटते. करवीर रियासतकार स.मा. गर्गे यांनी सुध्दा त्याच हकीकतीला जास्त महत्त्व दिल्याचे दिसते. म्हणूनच त्यानी त्या आधारे सांगितले आहे, की महाराज निघून गेल्यावर महाडिकाचा मुलगा किल्ला लढवत होता. पण किल्ल्यामध्ये महाराज नसल्याने गोंधळ निर्माण झाला. म्हणून महाडिकाने झुल्फिकारखाना-बरोबर तहाचे बोलणे सुरु केले. पण खान तयार होत नव्हता. सहा-सात महिने खानाची मोहिम चालू होती. त्याचे त्यात फार मोठे नुकसान झाले. त्याचा बदला त्याला घ्यावयाचा होता. पण गणोजी शिर्के, मोहिते व इतर मराठा सरदारांनी त्याची समजूत काढली. औरंगजेबाने सुध्दा पन्हाळा, सातारा वगैरे घेतेवेळी, तह करुन किल्ल्यातील माणसे व नोकर-चाकर यांना सुखरुपपणे सोडून दिले होते. ही बाब त्याच्या लक्षात आणून दिली. मग राजारामाच्या बायका मुलांनी व इतरांना सोडतो पण किल्ल्यावरील राजाराम महाराज यांना आम्ही सोडणार नाही, असे त्याने सांगितले. शिवाय राजाराम महाराजांना सोडून दिले तर बादशहा नाराज होईल, अशी अडचणही सांगितली. तेव्हा कठीण परिस्थितीचे भान ठेवून शिर्के व रखमाजी मोहिते, यांनी त्याला न दुखविता त्याच्या लक्षात आणून दिले, की राजाराम महाराज, "गडाबाहेर जाऊन सहा महिने झाले. महाराज आत असल्यास आम्ही तुम्हाला त्यांच्यासंबंधी काहीही भीड घालणार नाही."[६७] आणि अशा त-हेने ताराबाई व इतर राण्या यांची सुटका जिंजीहून झाली. शिर्के व रखमाजी मोहिते यांच्यासमवेत, हा कबिला विशाळगडावर राजाराम महाराज यांच्याकडे आला.[६८] रामचंद्रपंतानी या सर्व कालामध्ये राजारामाचा कबिला जिंजीहून विशाळगड येथे पोचेपर्यंत त्यास रस्त्यामध्ये उपद्रव होऊ नये, अशा त-हेची सर्व काळजी घेतली असली पाहिजे. कारण

---

६७. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. ३७-३८.

६८. केरवाडकर, र.वि., उपरोक्त., पृ. ५३.

"हुकूमतपन्हा" या नात्याने राजारामाचा कबिला जिंजीहून सुरक्षितपणे विशाळगडला आणणे, ही खरी त्याचीच कामगिरी होती. प्रत्यक्ष कामगिरी करण्यापेक्षा त्या कामगिरीची व्यवस्था करणे, व कामगिरी व्यवस्थित केल्याबद्दल सरदारांना इनाम व बक्षिस देणे त्याचे काम होते. म्हणूनच कबिला परत आल्यावर ज्यानी तो आणण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती, त्यापैकी गिरजोजी यादव यांना राजाराम महाराजाकरवी वतन दिल्याचा उल्लेख आहे.[६९]

पंताची राजारामाच्या जिंजी आगमनानंतरची कारकीर्द:

राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात विशाळगड येथे येऊन पोहचल्यावर औरंगजेबाच्या गोटात फार मोठे निराशेचे वातावरण पसरलेले होते. कोणत्याही परिस्थितीत आपण मराठ्यांना नेस्तनाबूत करु, अशी त्याची व मोगल सरदारांची खात्री होती. संभाजीच्या वधानंतर मराठ्यांना जिंकणे सोपे जाईल, असा कयास मोगलांनी बांधला होता. राजारामाला पकडण्यासाठी आणि महाराष्ट्र व कर्नाटकात मराठ्यांचा बिमोड करण्यासाठी औरंगजेबाने मुक्त हस्ते द्रव्य खर्च करुन आपल्या लष्कराला मराठ्यांच्या विरुध्द लढण्याला प्रोत्साहन दिलेले होते. जिंजीमध्ये राजाराम अडकून पडला होता, तेव्हा तो आपल्या हाती सापडल्यासारखे त्याला वाटले असावे म्हणून जिंजीच्या वेढ्यात सात आठ वर्षे त्याने कसलीही कसूर करु दिली नव्हती. तथापि तशाही कठीण परिस्थितीतून राजाराम निसटून आला होता. त्यामुळे मोगलांची सर्व कारस्थाने आणि द्रव्य फुकट गेली होती. राजाराम निसटून गेल्यामुळे खाफीखानाने सांगितल्याप्रमाणे, "हातातून पक्षी निघून गेला."[७०] अशी त्यांची निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली होती. म्हणजे मोगलांच्या कळपात, अशी निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली होती, तरी औरंगजेब मराठ्यांच्या विरुध्दची मोहिम थांबविणारा नव्हता. उलट कोणत्याही

६९. पवार,आप्पासाहेब., उपरोक्त., पृ. १०१.

७०. साने,का.न., संपा. उपरोक्त., पृ. १९.

परिस्थितीत मराठ्यांना कह्यावर आणाण्याचेच त्याचे धोरण होते. विशेषत: राजाराम जिंजीतून निसटून गेल्याने औरंगजेबाचा राग अधिकच वाढलेला होता, आणि तो मराठ्यांच्या उलट आपला लढा अधिक प्रखर करणारा होता.

या उलट मराठ्यांच्या गोटात राजाराम जिंजीहून सुखरूप परतल्यावर जरी आनंद झाला होता तरी त्याची आर्थिक परिस्थिती बिघडल्याने तेही अडचणीत होते. आता नवे आर्थिक धोरण काय आखावे, असा त्यांच्यापुढे प्रश्न होता. त्यांचा जवळ जवळ बहुतेक प्रदेश मोगलांच्या ताब्यात गेलेला होता. तिजोरीत द्रव्याचा साठा नव्हता. याचा परिणाम म्हणूनच बरेच मराठा सैन्य मोगलांच्याकडे सेवा चाकरीसाठी गेलेले होते. आणि मोगलांच्या विरुध्द लढण्याचे सामर्थ्य मराठ्यांच्यात उरलेले नव्हते. एवढेच नव्हे तर मोगलांच्याकडून आपण पकडले जावू की काय, अशी भीती राजाराम महाराजाना सुध्दा होती. म्हणूनच त्यांनी औरंगजेबाकडे तहाची बोलणी चालवली होती.[७१] औरंगजेब मात्र त्यावेळी खूप संतापलेला होता. कोणत्याही परिस्थितीत मराठ्यांना संपवण्याचा त्याचा इरादा होता. स्वाभाविकच राजारामाच्या तहाच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून त्याने स्वत:च्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या विरुध्द जोरदार मोहिम काढण्याचे निश्चित केले होते.[७२]

मराठ्यांच्या दृष्टीने हा काळ अत्यंत कठीण होता. किंबहुना संभाजीच्या वधानंतर, जशी परिस्थिती निर्माण झाली होती, तशीच गंभीर परिस्थिती, त्यावेळी निर्माण झाली होती. अशा वेळी मार्ग काढणे फार कठीण होते. तेव्हा त्या गंभीर परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी रामचंद्रपंत व दादो मल्हार

---

७१. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. ३९-४०.

७२. Brij, Kishore., op. cit., p. 58.

यांनी राजारामास सूचविले की त्यानी पुन्हा कर्नाटकात जावे. पण महाराजांनी ती गोष्ट मानली नाही. त्यानी महाराष्ट्रात राहूनच जुन्या सरदारांच्या बरोबर संबंध प्रस्थापित करुन त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याचे काम हाती घेतले. तर त्याचवेळी औरंगजेबाने आपले सैन्य दोन विभागात विभागून, एक भाग आपला नातू शहाजादा बेदारबख्त याच्या नेतृत्वाखाली दिला होता. त्याच्या मदतीला झुल्फिकारखान उपसेनापती म्हणून नेमला होता. दुसऱ्या विभागाचे नेतृत्व खुद्द औरंगजेब बादशहाच करीत होता. मराठ्यांनी या वेळेला धीर खचू न देता मोगलांच्या उलट जीवन मरणाचा स्वातंत्र्य लढा सुरु केला. रामचंद्रपंत त्यावेळेला थोडेसे नाराज झालेले होते. वेंद्रे यानी सांगितल्याप्रमाणे रामचंद्र पंतानी राजाराम जिंजीमध्ये असताना जरी जिंजीच्या संरक्षणासाठी सैन्य पाठवले होते, तरी त्यास वेळ लागला होता. म्हणून मराठ्यांना जिंजीचे राज्य गमवावे लागले होते. आणि त्याचा परिणाम म्हणूनच राजाराम महाराजांनी शंकराजी नारायण याना जवळ ठेवून रामचंद्रपंतास दूसरा कारभार सांगितला. राजापूर येथे पाठवले.[73] पुढे विशाळगड येथे राज्यकारभाराच्या दृष्टीने गैरसोयी झाल्याने मराठ्यांची राजधानी विशाळगडाहून सातारा येथे जुलै १६९८ मध्ये नेली.[74] त्यानंतर स्वत: कर्नाटकात मोहिम काढली व त्या मोहिमेवरुन मार्च १६९९ मध्ये पन्हाळगडला परंत आले. आणि पन्हाळ्याहून सातारा येथे जून १६९९ मध्ये आले. राजारामाच्या या धामधूमीच्या काळात रामचंद्रपंत यांच्यावर फार महत्त्वाची जबाबदारी होती. अर्थात त्यांना राजाराम महाराजांचा पूर्ण पाठिंबा होता. महाराष्ट्रात आल्यावर राजाराम महाराजांनी खानदेश, वऱ्हाड, विदर्भ या भागातून मराठ्यांच्या फौजा पाठवून तेथे नेमाजी शिंदे आणि इतरांच्याकडीने मराठ्यांचे प्रभुत्व

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

७३. आपटे, द. वि., व पोतरकर, रा. त्रि., ) संपा. उपरोक्त., पृ. ६८.

७४. पवार, आप्पासाहेब., उपरोक्त., पृ. ९८ व ४७७-४७८.

प्रस्थापित केले होते. सेनापती धनाजी जाधव, नेमाजी शिंदे परसोजी भोसले यांनी ब्रम्हपुरी येथील बादशाहाच्या छावणीवर हल्ले करून मराठ्यांचा गौरवशाली प्रताप प्रस्थापित केला होता. मराठा सरदार अशा त-हेने आपल्या धाडस आणि शौर्यामुळे मोगलांच्या छावणीतून राजारामाच्या आदेशानुसार शाहू महाराजाना सोडवून आणण्याचे प्रयत्न करीत होते. पण ते यश राजारामाला लाभले नाही.

जिंजीहून परतल्यावर राजारामाची कारकीर्द अगदी अल्पशी झाली. या काळात राजाराम रामचंद्र पंताच्या सल्ल्याशिवाय कांही करु शकत नव्हते. या संबंधी सरदेसाईनी राजाराम आणि रामचंद्र पंत यांच्यातील संबंध कसे होते, ते पुढील प्रमाणे सांगितले आहे. त्याच्या या सांगण्यात रामचंद्रपंतानी कसा राज्य कारभार केला, हेही स्पष्ट केले आहे. सरदेसाई म्हणतात---

जिंजीहून निघाल्यावर रस्त्याने मोगल फौजांशीं लढत राजाराम विशाळगडीं सुरक्षित येऊन पोंचला. मागाहून बायामंडळीही कांही दिवसांनी आली. आपात-प्रसंगी ज्यांनी स्वत:चे जीव धोक्यांत घालून राज्याचें कल्याण केलें, त्या सर्वांची सर्फराजी पुन: एकवार करण्यांत आली. त्या वेळी रामचंद्रपंत, परशुरामपंत व शंकराजी नारायण या त्रिवर्गानीं विनंति केली कीं, "आजपर्यंत कसेंं तसें राज्य-रक्षण केलें, आतां स्वामीनीं सांभाळावें." हे एकूण राजाराम संतुष्ट होऊन म्हणाला, "आजवर तुम्हींच राज्य रक्षिले, पुढेंही तुम्हीच रक्षाणार.' इतउत्तर रामचंद्रपंताच्या विचाराशिवाय, राजाराम कांही एक करिनासा झाला. त्याचे मदतीस शंताजी मंगाजी वाकनीस व आबाजी निळो पारसनीस यांस दिले. सातारा येथे नवीन केलेल्या राज्य व्यवस्थेत या वेळी बरेच फेरफार झाले. सेनापतीपद धनाजी जाधव याजकडे होतेच. नीळकंठ मोरेश्वर पिंगळे पेशवेगिरीवर होता. अमात्यापद जिंजी येथे जनार्दनपंत हणमंते याजकडे दिलेलें होतें. पुढे जनार्दनपंत

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

(१६९७ त) वारल्यामुळें तें आतां राजारामानें रामचंद्रपंत याजला दिलें. ह्या अमात्यपदाबद्दल हणमंते व रामचंद्रपंत यांजमध्ये बरेच दिवस चुरस होती. तें अखेरीस ज्याचें त्यास मिळून रामचंद्रपंताचे घराण्यास अमात्य हें आडनांव कायमचें प्राप्त झाले. हे पुढें बावडयास राहूं लागल्यामुळें, त्यास बावडेकर असेही म्हणतात."[७५]

वा.सी. बेंद्रे यानी सुध्दा रामचंद्रपंताच्या कामगिरीची दखल घेतलेली आहे. पण रामचंद्र पंताच्या स्वभावाचे दोष दाखविले आहेत.[७६] अर्थात राजाराम महाराजांनी आपल्या अंत्यकाळी सर्व मराठा सरदारांनी रामचंद्रपंताच्या आज्ञेत राहून मराठा राज्याचा कारभार चालवावा असे स्पष्टपणे सर्वांना सांगितले होते. या संबंधी बेंद्रे यानी चिटणीस बखरीतील निष्कर्ष जसाच्या तसा पुढील प्रमाणे घेतला आहे—

"काही दिवस हुषारीने मुक्काम करुन सिंहगडास गेलेवर नवज्वर जाहला. उपाय काही चालला नाही. त्यासमयी अमात्य वगैरे मुत्सद्दी यांस बोलावून सांगितले की, तुम्ही थोरले महाराजांपासून राज्यावर साधनास श्रम साहस करीत आला व करीत आहा, एक एक प्रतिसृष्टी करणार आहात. आमचा तो काळ समीप आला. याच्यामागे सर्व मिळोन हल्ली करिता तसे करावे. आम्ही गेलो म्हणून श्रमास अंतर न करिता शिवाजी महाराज सुटून येत ते करावे. त्याचें तामी लक्ष ठेवून करणे म्हणजे त्यास यश येईल हे तुम्हांस ठावेच आहे. त्यापेक्षा फार काय सांगू. म्हणोन रामचंद्रपंतांचे स्वाधीन केले. सर्वांचे स्वाधीन पंतास केलें. अमात्यांचे आज्ञेत सर्वांनी चालावे असा बंदोबस्त करून आपण ईश्वरभजनी लक्ष

---

७५. मराठीसमरि., भाग २, पृ. ६७१.

७६. बेंद्रेराजाराम., पृ. २६४.

ठेवून परधामाप्रती जाते झाले. त्या समयाचे वर्णन काये लिहावे ? राज्याभिषेक शाक २६, प्रमाथी संवत्सर, शाके १६२१ फाल्गुन वद्य, अष्टमी सह नवमीस (२ मार्च १७०० शनवार) काल जाला. सर्वत्रांस शोक जाहला. परंतु प्रसंग प्राप्त जाला तो विठोजीराव भोसले यांचे वंशातील जीवाजीराजे भोसले वावीकर याणीं विधी केला."[७७]

अशा त-हेने रामचंद्रपंताने राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत स्वराज्य व स्वराज्याच्या छत्रपती राजाराम, यांचे संरक्षण करण्याचा व त्या संरक्षणासाठी आवश्यक असलेले लष्करी व मुलकी प्रशासन अत्यंत चतुराईने तथा अक्कल हुषारीने चालवून यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच धनी नसलेले मराठा राज्य औरंगजेबालाही नष्ट करता आले नाही.

---

७७. उपरोक्त, २८०.

......